महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई

**माहिती तंत्रज्ञान व संगणक विज्ञान ज्ञानमंडळ,**

संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान विभाग,

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

# ऑनलाईन बैठक

प्रति,

महोदय / महोदया,

दिनांक २५ जानेवारी २०२० रोजी झालेल्या माहिती तंत्रज्ञान व संगणकशास्त्र ज्ञानमंडळाच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे उपविषयवार नोंदीचे विषयवार यादी व इतर गोष्टींना अंतिम स्वरूप देण्यासाठी ज्ञानमंडळ सल्लागार समिती व विषय तज्ञांची प्रलंबित बैठक फेब्रुवारी मध्ये घेणे अपेक्षित होते परंतु काही सदस्यांच्या कामाच्य व्यापामुळे ती होऊ शकली नाही. सदरील बैठक मार्च मध्ये मुंबई किंवा औरंगाबाद येथे घेण्याचे ठरले होते. परंतु कोविड-१९(COVID-19) मुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे ती होऊ शकली नाही.

दरम्यान ज्ञानमंडळाचे विषयपालक राहुल देशमुख यांनी सुचविल्याप्रमाणे माहिती तंत्रज्ञान व संगणक विज्ञान ज्ञानमंडळाची, प्रलंबित बैठक सध्याच्या परिस्थितीमध्ये ऑनलाईन (गुगल हॅगआउट व्दारे) घेऊन काम पुढे सुरु ठेण्याचे ठरले.

त्या अनुसंघाने महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोशाच्या, "माहिती तंत्रज्ञान व संगणक विज्ञान " ह्या खंडाच्या निर्मितीदरम्यान अंतर्भूत करण्यात येणाऱ्या नोंदीबाबत चर्च्या करण्यासाठीची ऑनलाईन बैठक मंगळवार दि. ३१ मार्च २०२० रोजी सकाळी ११:३० वाजता, गुगल हॅगआउट व्दारे आयोजित करण्यात आली. सदरील बैठकीस खालील विषयपालक, समन्वयक, सल्लागार मंडळ सदस्य, विषयतज्ज्ञ आणि निमंत्रित सदस्य सहभागी झाले.

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ.राहुल देशमुख | विषयपालक,<br>माहिती तंत्रज्ञान व संगणकशास्त्र ज्ञानमंडळ |
| २) | डॉ.रत्नदीप देशमुख | समन्वयक,<br>माहिती तंत्रज्ञान व संगणकशास्त्र ज्ञानमंडळ |
| ३) | डॉ.सुनील भिरूड | ज्ञानमंडळ सल्लागार मंडळ सदस्य |
| ४) | डॉ.सचिन देशमुख | ज्ञानमंडळ सल्लागार मंडळ सदस्य |
| ५) | डॉ. विजय पांढरीपांडे विशेष निमंत्रित- | निमंत्रित विषय तज्ञ, माजी कुलगुरू, डॉ.बा.आ.म.वि. औ.बाद |
| ६) | डॉ.एम.व्ही.ठाकरे | समन्वयक, उपज्ञानमंडळ (प्रस्तावित), अमरावती विद्यापीठ |
| ७) | डॉ राजीवकुमार मेंथे | समन्वयक,उपज्ञानमंडळ, सोलापूर विद्यापीठ |
| ८) | डॉ. श्रीराम राउत | उपसमन्वयक, उपज्ञानमंडळ, सोलापूर विद्यापीठ |
| ९) | डॉ.रविद्र हेगडी | निमंत्रित विषय तज्ञ - केंन्द्रीय विद्यापीठ, गुलबर्गा, कर्नाटक |
| १०) | श्री.प्रदिप राठी | निमंत्रित विषय तज्ञ - विभागीय उपाध्यक्ष- CSI मुंबई |
| ११) | डॉ. सुनिल वाघ | निमंत्रित विषय तज्ञ – संचालक, महात्मा गांधी अभियांत्रिकी<br>महाविद्यालय, नोइडा, दिल्ली |
| १२) | डॉ.शशिकांत घुमरे | निमंत्रित विषय तज्ञ - शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,<br>अवसरी, पुणे |
| १३) | डॉ. नारायण भोसले | निमंत्रित विषय तज्ञ - इंदिरा गांधी केंद्रीय जनजातीय विद्यापीठ, अमरकंटक, मध्यप्रदेश |
| १४) | डॉ. विशाल वाघमारे | निमंत्रित विषय तज्ञ - विवेकानंद महाविद्यालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर |
| १५) | श्रीमती. स्नेहा खोब्रागडे | विद्याव्यासंगी, |

| | | |
|---|---|---|
| | | महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,मुंबई |

सदरील बैठकीत महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोशाच्या, " माहिती तंत्रज्ञान व संगणक विज्ञान " ह्या खंडाच्या निर्मितीदरम्यान अंतर्भूत करण्यात येणाऱ्या नोंदीबाबत चर्चा करण्यात आली.

सर्वप्रथम डॉ. रत्नदिप देशमुख यांनी सदस्यांचा परिचय करुन दिला आणि सर्व सदस्यांचे स्वागत केले. नवीन निमंत्रित सदस्यांना महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई आणि माहिती तंत्रज्ञान व संगणकशास्त्र ज्ञानमंडळ यासंदर्भात सविस्तर माहिती देवून विश्वकोशाच्या संकल्पनेबद्दल माहिती दिली.

त्यानंतर डॉ. राहूल देशमुख यांनी प्रस्ताविकात विश्वकोश निर्मितीचा इतिहास, कोशीय लेखनाचे स्वरूप, संकल्पना आणि निकष याबाबतीत विस्तृत विवेचन केले. जवळपास १५०० नोंदीची यादी तज्ज्ञाच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्याचे प्रस्तावित केले.

डॉ. सचिन देशमुख यांनी नोंदयादीसाठी Google Sheet तयार करण्यात आल्याचे सांगून मुख्य विषयांतर्गत उपविषयाचे sheet तयार करण्यात आल्याचे सांगितले. तसेच Google Sheet मध्ये कसे काम करायचे याबद्दल मार्गदर्शन केले. त्यानंतर उपस्थितांच्या प्रश्नांचे अनुषंगाने तज्ज्ञांनी सविस्तर चर्चा केली. उपस्थित तज्ज्ञांना उपविषयानुरूप नोंदयादी तयार करण्याचे विभागणी करुन जबाबदारी देण्यात आली.

**दि. ६ एप्रिल, २०२० रोजी नोंदयादी तयार करण्याच्या निमित्ताने आढावा बैठकीचे आयोजन करण्यात बैठकीचा कार्यवृत्तांत खालीलप्रमाणे:**

१. दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी घेण्यात आलेल्या बैठकीच्या अनुषंगाने, सर्वप्रथम डॉ. रत्नदिप देशमुख यांनी बैठकीचे प्रास्ताविक करून मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे आज दि. ६ एप्रिल, २०२० रोजी नोंदयादी तयार करण्याच्या निमित्ताने आढावा बैठकीचे नियोजन करण्यासंदर्भातील भूमिका सांगून बैठकीस सुरवात केली. बैठकीत

ठरल्याप्रमाणे नोंदयादी तयार करण्याकरिता तयार करण्यात आलेल्या Google Sheet मधील मुख्य Domain वर त्यांनी भाष्य केले.

२. राहूल देशमुख यांनी कमी कालावधीत तज्ज्ञांनी दिलेल्या उत्तुंग प्रतिसादाबद्दल सर्वांचे आभार मानले. मागील बैठकीत ठरवण्यात आलेल्या सुमारे १५०० नोंदींच्या उद्दिष्टा पैकी १२०० पेक्ष्या ज्यास्त नोंदींचा टप्पा एकूण पाच राज्यातील विषय तज्ज्ञांनी पहिल्याच आठवड्यात गाठल्याचे त्यांनी नमूद करून पुढील आठवड्यात १००% उद्दिष्ट पूर्ण होईल असा विश्वास व्यक्त केला.

खंडाच्या परिपूर्णतेकरिता आणि परिपक्वतेकरिता थोडा अधिक कालावधी घेऊन आणखी महत्वपूर्ण आणि संकीर्ण नोंदींची भर **विषयतज्ञांनी** घालावी असे त्यांनी सुचविले. उदा. संगणक क्षेत्रातील पुरस्स्कार (Awards), महत्वाची पुस्तके, जर्नल्स, महत्त्वाच्या कार्यशाळा, शोध, संशोधन, चित्रपट, चित्रपटातील संगणीकृत व्यक्तिरेखा - वेब टेक्नॉलॉजी इत्यादी विषय समाविष्ट करण्याचे त्यांनी सांगितले.

३. डॉ. रत्नदीप देशमुख यांनी तयार नोन्दयादीचे सविस्तर विवेचन करून उपस्थित तज्ज्ञांना माहिती करून दिली आणि उपस्थित सदस्यांना काही अडचणी अथवा सूचना करावयाच्या अनुसंघाने चर्चा करण्यास सांगितले.

४. **डॉ राजीवकुमार मेंथे** यांनी हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर मधील संधी, पदे आणि जबाबदार्या (Opportunities and Positions) इत्यादी बाबी समाविष्ट करण्यास सुचविले.

५. श्री. प्रदीप राठी यांनी Organizational Personalities आणि Academic Institutions त्यांची सविस्तर माहिती समाविष्ट करण्यास सुचविले.

६. डॉ. श्रीराम राऊत यांनी मूलभूत संगणक, MSCIT अंतर्गत बाबी समाविष्ट करण्यास सुचविले.

डॉ.सचिन देशमुख, डॉ.रविद्र हेगडी, डॉ.शशिकांत घुमरे, डॉ. नारायण भोसले, डॉ. विशाल वाघमारे, श्रीमती. स्नेहा खोब्रागडे यांच्यासह सर्व सदस्यांनी चर्चेत सहभाग घेतला.

उपरोक्त विषयाच्या संदर्भाने आपणास कळवण्यात येते की, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोशाच्या, " माहिती तंत्रज्ञान व संगणक विज्ञान " ह्या खंडाच्या निर्मितीदरम्यान अंतर्भूत करण्यात येणाऱ्या नोंदीना अंतिम स्वरुप देण्यासाठी चर्च्या करण्यासाठीची **ऑनलाईन बैठक मंगळवार दि. १३ एप्रिल २०२० रोजी सकाळी ११:३० वाजता, गुगल हॅंगआउट व्दारे** आयोजित केली आहे. **सदर बैठकीसाठी श्री. हर्षवर्धन जाधव, सहायक सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,मुंबई यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.**

बैठकीत सहभागी होण्यासाठी लागणारा निमंत्रण दुवा (इन्व्हाईट लिंक) आपणास इमेल द्वारे प्राप्त होईल.

## बैठकीचा अजेंडा:

सदरील बैठकीच्या चर्चेसाठी खालील विषय ठेवण्यात येणार आहेत.

१) सर्व सन्माननीय सदस्यांचा परिचय आणि स्वागत- डॉ.रत्नदीप देशमुख

२) प्रास्ताविक - डॉ.राहुल देशमुख

३) तांत्रिक बाबीवरील माहिती - डॉ.सचिन देशमुख

४) वरील मुद्यांच्या अनुषंगाने चर्चा

५) बैठकीचा समारोप व आभार -डॉ.रत्नदीप देशमुख

आपण सदर बैठकीस उपस्थित राहावे हि विनंती.

डॉ. रत्नदीप देशमुख

समन्वयक,

माहिती तंत्रज्ञान व संगणकशास्त्र

ज्ञानमंडळ

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,मुंबई